॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

✻ सुविचार ✻
प्रत्येक संकट ही
एक नवीन संधी असते.

■ अहिल्यानगर ■ मंगळवार, दि. ९ जून २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १५ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

## SPOT NEWS

### उज्ज्वला गॅस सिलिंडर आता चारच मिळणार

● **नवी दिल्ली** – मोदी सरकारने प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या नियमांमध्ये एक मोठा बदल केला आहे. सरकारने आता अनुदानित एलपीजी सिलिंडर रिफिलची वार्षिक संख्या नऊवरून चारवर आणली आहे. याचा अर्थ, उज्ज्वला योजनेअंतर्गत येणाऱ्या कुटुंबांना वर्षाला केवळ चार सिलिंडरवरच अतिरिक्त अनुदानाचा लाभ घेता येणार आहे. एका सरकारी अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले की, सरासरी घरगुती वापर लक्षात घेऊन हा बदल करण्यात आला आहे. २०१६ मध्ये सुरू झालेल्या या योजनेअंतर्गत, लाभार्थ्यांना पूर्वी वर्षाला १२ अनुदानित १४.२ किलोग्रामचे सिलिंडर मिळत होते. तथापि, गेल्या वर्षी अनुदानित सिलिंडरची संख्या नऊवर आणण्यात आली होती आणि आता ती आणखी कमी करून चार करण्यात आली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव, प्रवीण माल खानुजा यांनी सांगितले की, ही सुधारित मर्यादा उज्ज्वला लाभार्थ्यांच्या सरासरी वार्षिक गॅस वापराच्या जवळपास आहे.

### नेमून दिलेल्या हॉटेलांवर एसटी न थांबल्यास दंड

● **मुंबई** – एसटीच्या भरारी पथकाने महामार्गावरील एसटी महामंडळाने नेमून न दिलेल्या हॉटेलांवर बस उभ्या करणाऱ्या १३१ बसवर कारवाई केली आहे. दोन महिन्यांत केलेल्या या कारवाईतील एसटी बस राज्याच्या विविध भागांतील आहेत. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून कर्मचाऱ्यांच्या पगारातून पैसे वसूल केले जाणार आहेत. एसटीचालक महामार्गावर कोणत्याही हॉटेलवर थांबून फक्त स्वत:चाच फायदा पाहत होते. हॉटेल चालकाकडून प्रवाशांची लुटमार करण्यात येत होती. अशा तक्रारी वाढल्यानंतर एसटी प्रशासनाने प्रत्येक मार्गावर अधिकृत हॉटेलची नेमणूक केली. त्यांना प्रवाशांकडून नाश्ता, जेवणासाठीचे दर निश्चित करून दिले; तसेच त्या ठिकाणी स्वच्छता व्यवस्थित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. परवानगी नसलेल्या हॉटेलवर बस उभ्या करणा-या चालकांवर कारवाईचा इशारा दिला होता. तरीही चालकांकडून फायद्यासाठी परवानगी नसलेल्या हॉटेलवर बस उभ्या केल्या जात आहेत. अशा बसवर भरारी पथकामार्फत कारवाई करण्यात येत आहे.

### अखेर नाफेडची बाजार समित्यांमध्ये एंट्री!

● **नाशिक** – नाफेड आणि एनसीसीएफकडून यापूर्वीही कांदा खरेदी केली जात होती. मात्र ही खरेदी अनेकदा बाजार समित्यांच्या बाहेर स्वतंत्र केंद्रांवर होत होती. त्यामुळे अनेक शेतक-यांना माहिती मिळत नव्हती, तर काहींना वाहतूक आणि नोंदणीसंबंधी अडचणींचा सामना करावा लागत होता. शेतकरी संघटना, कांदा उत्पादक संघटना आणि लोकप्रतिनिधी अनेक वर्षांपासून एकच मागणी करत होते. सरकारी कांदा खरेदी थेट बाजार समित्यांमधून व्हावी. दोन दिवसांपूर्वी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत यासंदर्भात अंतिम निर्णय घेण्यात आला आणि आजपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

# मोदी सरकारच्या विरोधात इंडिया आघाडीची एकजूट

## बैठकीत ५ मुद्यांवर मतैक्य । एसआयआरला विरोध, शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागणार

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

इंडिया आघाडीने मोदी सरकारविरोधात पुन्हा एकजुटीची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर आज राजधानी दिल्लीत इंडिया आघाडीची बैठक पार पडली. या बैठकीला देशभरातून एकूण २५ राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी हजेरी लावली होती. विशेष म्हणजे तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनीही उपस्थिती लावली. या बैठकीत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी, एसआयआरबाबत सरन्यायाधीशांना पत्र यासह ५ मुद्यांवर एकमत झाले आणि या मुद्यांसाठी संघर्ष करू, त्यावर काम करू आणि पुढे जाऊ, असा निर्धार बोलून दाखविला.

या बैठकीनंतर खरगे यांनी पत्रकार परिषदेत या बैठकीतील निर्णयाबाबत सर्व माहिती दिली. या बैठकीला काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सपा नेते अखिलेश यादव, राजदचे यशस्वी यादव, महेबुबा मुफ्ती, मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे तिन्ही प्रमुख पक्षांच्या नेत्यांचा सहभाग होता. यात शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनीही व्हर्च्युअलच्या माध्यमातून बैठकीत सहभाग घेत आपली मते मांडली.

नुकत्याच पार पडलेल्या ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची ही पहिलीच बैठक होती. या बैठकीला तृणमूलच्या नेत्या ममता बॅनर्जींनी हजेरी लावली. या बैठकीपूर्वी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि ममता बॅनर्जी यांची गळाभेट लक्षवेधी ठरली. या बैठकीत ५ मुद्यांवर एकमत झाले. इंडिया आघाडी या ५ मुद्यांवर भविष्यात काम करणार असून लढणार आणि पुढे जाणार असल्याचे काँग्रेस अध्यक्ष तथा इंडिया आघाडीचे नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले.




या पाच मुद्यांमध्ये एसआयआर, नीट पेपरफुटीवरून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागणार, देशाची आर्थिक स्थितीसंदर्भाने प्रामुख्याने चर्चा झाली. तसेच पुढील बैठक हैदराबाद येथे होणार असल्याचेही जाहीर करण्यात आले. विशेष म्हणजे कॉकरोच जनता पार्टीने पहिल्या आंदोलनात उचलून धरलेला मुद्दाही इंडिया आघाडीच्या बैठकीत प्रकर्षणाने जाणवला. त्यानुसार केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची राजीनाम्याची मागणी करण्याची मागणी लावून धरली जाणार आहे.

दरम्यान, इंडिया आघाडीच्या या बैठकीवर सत्ताधारी भाजप महायुतीच्या नेत्यांकडून टीका होत आहे. शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे हे दिल्लीतच असल्याने त्यांनी तेथून इंडिया आघाडी आणि काँग्रेस नेत्यांवर टीका केली तर उद्धव ठाकरेंनाही टोला लगावला. दरम्यान, आजच्या बैठकीला महाराष्ट्रातून उद्धव ठाकरे आणि झारखंडमधून हेमंत सोरेन ऑनलाईन सहभागी झाले होते, त्यांनी देखील या मुद्यांना आपली सहमती दर्शवली.

### पंतप्रधानपदाचा चेहरा हवा : उद्धव ठाकरे

■ इंडिया आघाडीच्या आज झालेल्या बैठकीत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी पंतप्रधानपदाचा उमेदवारी निवडला पाहिजे, अशी भूमिका मांडली. खासदार संजय राऊत यांनी याविषयी सविस्तर माहिती दिली. देशाचे नेतृत्त्व करणारा हा आमचा चेहरा आहे, असे आपण लोकांना दाखवले पाहिजे, असे मत ठाकरे यांनी मांडले. आता आगामी बैठक ऑगस्ट महिन्यात हैदराबाद येथे होणार आहे.

### बैठकीतील प्रमुख ५ मुद्दे

- लवकरच सरन्यायाधीश यांना एसआयआरवर पत्र लिहिणार
- धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा झाला पाहिजे
- आर्थिक स्थिती, बेरोजगारी आणि शेतकरी मुद्यांवर केंद्र सरकारने तात्काळ सर्वपक्षीय बैठक बोलवावी
- प्रत्येक दोन महिन्यांनी इंडिया आघाडीची बैठक होणार, पुढील बैठक हैदराबाद येथे होणार
- पावसाळी अधिवेशनात इंडिया आघाडीतील पक्षांत समन्वय साधला जाणार, दररोज विरोधी पक्षाच्या कक्षात बैठक होणार

# अहिल्यानगर जिल्ह्यात आज वादळी वाऱ्यासह पावसाचा 'येलो अलर्ट'

## नागरिकांनी दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार जिल्ह्यात ८ व ९ जून २०२६ या कालावधीत तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता असल्याने जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य नुकसान टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना होत असताना, विजा चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना नागरिकांनी झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबू नये. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. तसेच टॉवर्स, ध्वजांचे खांब, विजेचे खांब, धातूचे कुंपण, रोहित्र व लोंबकळणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा व कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. घराबाहेर मोकळ्या जागेत असताना वीज चमकल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने कान झाकावेत व डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये ठेवून जमिनीशी कमीत कमी संपर्क ठेवावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल तसेच जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी त्यांच्या आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वादळी वारा, पाऊस व गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करून आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीत विक्रीसाठी आणलेल्या वा नियोजित केलेल्या मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. धरण व नदी क्षेत्रात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेऊन धरणाच्या पाण्यात, नदीच्या वा कालव्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये व धोकादायक ठिकाणी स्वतःचे छायाचित्र काढू नये.

कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करावे. मदतीसाठी नजीकचे पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय येथील ०२४१-२३२३८४४, ०२४१-२३५६९४० या दूरध्वनी क्रमांकांवर किंवा ११२, १०७७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# लंडन ते पंढरपूर पहिली ग्लोबल दिंडी भगवानगडाचे महंत नामदेव महाराज शास्त्रीजींच्या उपस्थितीत मार्गस्थ

## विठूनामाचा गजर सातासमुद्रापार! ११ देश अन् ५० दिवसांचा प्रवास

● **पाथर्डी । वीरभूमी–**

महाराष्ट्राला सध्या आषाढी वारीचे वेध लागले असून विठ्ठलाची भक्ती आता सातासमुद्रापार पोहोचल्याचे अनोखे चित्र पाहायला मिळत आहे. आषाढी यात्रेसाठी थेट लंडनवरून पंढरपूरकडे पहिलीवहिली 'ग्लोबल दिंडी' भगवानगडाचे महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्या हस्ते पुजा करुन मार्गस्थ झाली आहे. ही दिंडी ११ देश आणि तब्बल ५० दिवसांचा प्रदीर्घ प्रवास करून, शेकडो परदेशी व मराठी भाविकांसह आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपुरात दाखल होणार आहे.

शनिवार, ६ जून रोजी लंडन येथील विंडसरमधून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या पालखीचे पंढरपूरकडे अत्यंत उत्साहात प्रस्थान झाले. या दिंडीचे आयोजन अनिल खेडकर या मराठी विठ्ठल भक्ताने केले आहे. परदेशात राहणाऱ्या मराठी बांधवांनी या सोहळ्यासाठी विशेष तयारी केली होती.

पालखी प्रस्थानाच्या वेळी संपूर्ण लंडन परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते तेथील वारकरी. पुरुषांनी पारंपारिक धोतर-कुर्ता, डोक्यावर गांधी टोपी किंवा फेटा, तर महिलांनी नऊवारी साड्या नेसून हजेरी लावली होती. हातात टाळ-मृदंग आणि खांद्यावर भगवी पताका घेऊन भाविकांनी 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल'चा जयघोष करत संपूर्ण परिसर दणाणून सोडला.



ही ऐतिहासिक ग्लोबल दिंडी एकूण ५० दिवसांचा प्रवास करणार असून २६ जुलै रोजी पंढरपुरात दाखल होईल. या वारीची अनुभूती घेण्यासाठी शनिवारी प्रथमच थेट लंडनहून विठुरायाच्या दर्शनासाठी युके, फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी, नेदरलँड्स इ. देशांतील परदेशी वारकरी पंढरपूरमध्ये दाखल होणार आहेत.

या ग्लोबल वारीमुळे सातासमुद्रापारचे हे अनेक देश आता वारकरी संप्रदायाशी जोडले जाणार आहेत. हजारो किलोमीटरच्या या अद्भुत भक्ती प्रवासात विठ्ठल नामाचा गजर होणार आहे.

# सीना नदी संवर्धनासाठी युद्धपातळीवर कामे राबविणार

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील । सीना नदी पत्रातील अतिक्रमित वीटभट्ट्यांवरही कारवाई होणार

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

सीना नदी हा अहिल्यानगर शहराचा मानबिंदू असून नदी संवर्धन, अतिक्रमण निर्मूलन आणि नदीपात्र रुंदीकरणासाठी व्यापक स्तरावर कामे हाती घेण्यात येणार आहेत. अतिक्रमण करणाऱ्या वीटभट्ट्यांसह कोणीही असले तरी त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच, नदीचे नैसर्गिक स्वरूप जपून नागरिकांसाठी चांगल्या सार्वजनिक जागा विकसित केल्या जातील, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शहरातील सीना नदीच्या हद्द निश्चितीच्या कामाची पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ड. धनंजय जाधव, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता अलका अहिरराव यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, गेल्या काही वर्षांत नदीच्या भोवताली मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाल्याने नदीचे पात्र शिल्लक राहिलेले नाही. आमदार संग्राम जगताप यांनी यासाठी विशेष पुढाकार घेतला असून, पहिल्या टप्प्यात ३ किलोमीटरपर्यंतचे रुंदीकरण व अतिक्रमण काढण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. आता नव्याने महापालिकेला आपत्ती व्यवस्थापनातून आणि जलसंपदा खात्याकडून निधी उपलब्ध करून हे काम पूर्ण केले जाईल. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून संपूर्ण १४-१५ किलोमीटर नदीपात्रातील अतिक्रमणे हटवून रुंदीकरणाचे काम जलसंपदा विभागाच्या माध्यमातून युद्धपातळीवर केले जाणार आहे.

शहरातील अनेक नाल्यांचे प्रवाह अतिक्रमणामुळे थांबले असून याचा थेट परिणाम शहराच्या आरोग्य व्यवस्थेवर झाला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांसोबतही चर्चा झाली आहे. हे नाले प्रवाही व अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महापालिकेला सोबत घेऊन जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर पुन्हा नव्याने सर्वेक्षण केले जाईल.

महानगरपालिकेचे सांडपाणी १०० टक्के प्रक्रिया करूनच नदीमध्ये सोडले गेले पाहिजे. अन्यथा नदी स्वच्छ करूनही उपयोग होणार नाही. यासाठी सध्याच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता कमी असल्यास, महापालिकेला आवश्यक त्या सुविधा आणि वाढीव प्रकल्पासाठी स्वतः तरतूद करू, अशी ग्वाहीदेखील पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी यावेळी दिली.

यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी सीना नदी हद्द निश्चिती, अतिक्रमण हटविणे, रुंदीकरण तसेच संवर्धनासाठी प्रस्तावित कामांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.



# SPOT NEWS

## जागतिक सायकल दिनानिमित्त अहिल्यानगरात सायकलिंगचा जल्लोष

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने आणि इन्फिनिटी सायकलिंग अकॅडमी व बाईक टेक पॉईंट यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ७ जून) राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धा उत्साहात पार पडली. यासोबतच महिलांसाठी विशेष असलेल्या 'अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग' देखील मोठ्या उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील नामांकित महिला व पुरुष सायकलपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेत सायकलिंगचा रोमांचक अनुभव दिला. जिल्ह्यातील सायकलपटूंच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण क्रीडामय झाले होते. पेमराज सारडा महाविद्यालय मैदानापासून स्पर्धेला प्रारंभ झाला. महिलांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये संधी मिळावी आणि सायकलिंग क्षेत्रात त्यांचे प्रोत्साहन वाढावे या उद्देशाने खेलो इंडिया अंतर्गत सलग दुसऱ्या वर्षी या लीगचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ६ वाजता सारडा महाविद्यालय मैदानावरून 'स्लो झोन'च्या माध्यमातून स्पर्धेला सुरुवात झाली. पत्रकार चौक, डीएसपी चौक, स्टेट बँक चौक, चांदणी चौक, सोलापूर चौक मार्गे टँक म्युझियमपर्यंत सायकलपटूंनी प्रवास केला. टँक म्युझियमपासून मुख्य स्पर्धेला सुरुवात झाली. पुरुषांची स्पर्धा वाळुंज, चांदबिबी बायपास चौक मार्गे पुन्हा टँक म्युझियम येथे समाप्त झाली. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी शिवछत्रपती पुरस्कार विजेते गणेश पवार, राष्ट्रीय पदकविजेते गौरव सिंह, राष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग प्रशिक्षक संकल्प थोरात, श्रीनिवास लोंढे, प्रा. साईनाथ थोरात, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव प्रा. संजय साठे, संभाजी मोहिते (कोच–इन्फिनिटी सायकलिंग अकॅडमी) , लाला कांबळे, वैभव भोर, सागर करांडे, राष्ट्रीय पदकविजेते ओम करांडे, बाळासाहेब दीक्षित, वासुदेव पांढरे, अनिल भवर, अशोक गाडेकर, शिवनाथ मोहिते, सरपंच विष्णू थोरात, किरण बोयणे, पांडुरंग भोजने, विकास भालेराव, मोबिन शेख तसेच सिंहगड सायकलिंग फाउंडेशन (पुणे)चे नितीनजी थोपटे आदी मान्यवर उपस्थित होते. विजेत्यांना रोख रक्कम, मेडल्स आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. महिलांसोबतच हौशी पुरुषांसाठी ४० किलोमीटर सायकल फन राईड, मेन्स ४० किलोमीटर स्पर्धा तसेच १८ वर्षांखालील मुलांसाठी २० किलोमीटर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेतील विजेत्यांसाठी एकूण ८० हजार रुपयांची रोख बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेसाठी राष्ट्रीय सायकलिंग महासंघ, खेलो इंडिया आणि जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी अहिल्यानगर सायकलिंग असोसिएशन, सायकलिंग फेडरेशन ऑफ अहिल्यानगर तसेच राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय यश मिळविणाऱ्या सायकलपटूंचा सत्कार करण्यात आला.

## राहुरी कृषी विद्यापीठ सुरक्षारक्षक हत्याकांडाची सीआयडी चौकशी करा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेल्या मागासवर्गीय दलित कुटुंबातील श्रीकांत पोपट दोंदे यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी संपूर्ण घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, शिवसेना उपजिल्हाप्रमुख आनंदराव शेळके, कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा सचिव विजय लोंढे, महिला जिल्हाप्रमुख कावेरी भिंगारदिवे तसेच रमाकांत दोंदे, पोपट दोंदे, शशिकला दोंदे, सहादू दोंदे, बाळासाहेब दोंदे, सिंधुबाई साळवे, तानाजी साळवे, गवराज साळवे, राजेंद्र पाटोळे, ज्योती पाटोळे, किशन कांबळे, कल्याण गायकवाड, मनोज चौहान, विक्रम आल्हाट आदींसह शिवसेना व विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना सामाजिक न्याय विभागाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्रीकांत दोंदे हे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होते. २ जून २०२६ रोजी कर्तव्यावर असताना त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना अत्यंत गंभीर असून यामागील सर्व पैलूंची निष्पक्ष व सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. सध्या सुरू असलेला तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात यावा तसेच या प्रकरणाचा तपास स्वतंत्र आणि निष्पक्ष यंत्रणेमार्फत करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात विद्यापीठ प्रशासनाच्या सुरक्षाविषयक हलगर्जीपणावरही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. श्रीकांत दोंदे ज्या ठिकाणी सुरक्षा रक्षक म्हणून काम करत होते, त्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते, पुरेशी प्रकाशयोजना नव्हती तसेच सुरक्षारक्षकांना स्वतःच्या संरक्षणासाठी किंवा विद्यापीठाच्या सुरक्षेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले नव्हते. याशिवाय वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्यांकडून नियमित पाहणी व देखरेखही होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# चांदेबुद्रुक येथे अठराव्या शतकातील मोडी लिपीतील शिलालेखाचा शोध

**खंडोबा मंदिर परिसरात आढळला ऐतिहासिक पुरावा । मराठाकालीन भक्तीपरंपरा आणि फारशी प्रभावाचे दर्शन**

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

कर्जत तालुक्यातील मौजे चांदेबुद्रुक येथील खंडोबा मंदिर परिसरात अठराव्या शतकातील मोडी लिपीतील एक महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून आला आहे. या शिलालेखातून मराठाकालीन धार्मिक जीवन, भक्तीपरंपरा तसेच तत्कालीन भाषिक आणि सांस्कृतिक प्रभावांचे महत्त्वपूर्ण ऐतिहासिक संदर्भ समोर आले आहेत.

चांदे-मिरजगाव मार्गावरील चौकाजवळ असलेल्या खंडोबा मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस हा चार ओळींचा कोरीव शिलालेख आढळतो. अनेक वर्षे उघड्यावर असल्याने शिलालेखावरील काही अक्षरे झिजली असली तरी छाप घेतल्यानंतर त्यावरील मजकूर स्पष्टपणे वाचण्यात संशोधकांना यश आले.

शिलालेखाचे वाचन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे –

***श्री***
***मार्तंडाचे सेवेस***
***भीव दिमत***
***लमाद निन***

या शिलालेखाचे संशोधन राजेश इंगळे यांनी केले असून वाचन अनिल दुधाणे यांनी केले आहे. शिलालेखातील श्री मार्तंडाचे सेवेस हा उल्लेख खंडोबा अर्थात मार्तंड देवतेप्रती असलेल्या भक्तिभाव, निष्ठा आणि देवसेवेच्या परंपरेचे द्योतक असल्याचे संशोधकांनी नमूद केले.

शिलालेखातील भीव किंवा भिवाजी या नावाच्या उल्लेखामुळे त्या काळातील देवस्थानाशी संबंधित व्यक्ती, त्यांची भूमिका आणि स्थानिक समाजरचनेबाबत महत्त्वपूर्ण माहिती मिळण्याची शक्यता आहे. तसेच दिमत हा शब्द फारशी भाषेतील दिमती या संज्ञेशी संबंधित असू शकतो. त्यामुळे मराठाकालीन धार्मिक आणि प्रशासकीय व्यवहारांवर फारशी भाषेचा प्रभाव असल्याचे संकेतही या शिलालेखातून मिळतात.

अभ्यासकांच्या मते, हा शिलालेख केवळ धार्मिक नोंद नसून मराठाकालीन सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरू शकतो. भक्तीपरंपरा, देवस्थान व्यवस्थापन आणि तत्कालीन लोकजीवनाचा मागोवा घेण्यासाठी हा शिलालेख उपयुक्त ठरणार आहे. श्रीच्या चरणी तत्पर असल्याची स्मृती जपणे हेच या शिलालेखामागील प्रमुख प्रयोजन असावे, असेही संशोधनातून पुढे आले आहे.



या शिलालेखाचे शोधकार्य, छायाचित्रण, संदर्भ संकलन आणि माहिती संकलन अनिल दुधाणे यांनी केले. या संशोधन कार्यासाठी शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन संचलित शिवदुर्ग वारसा संवर्धन समितीचे राजेश इंगळे, दिगंबर भुजबळ, सचिन भोसले तसेच स्थानिक नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## राळेगण सिद्धी येथे ११ जून रोजी राज्य शिक्षक संघाची महामंडळ सभा व शिक्षण हक्क परिषद

**● पारनेर । वीरभूमी –**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची महत्त्वपूर्ण महामंडळ सभा आणि शिक्षण हक्क परिषद येत्या ११ जून २०२६ रोजी पारनेर तालुक्यातील राळेगण सिद्धी येथील स्वर्ग लॉन्समध्ये आयोजित करण्यात आली आहे. सकाळी १० वाजता सुरू होणाऱ्या या परिषदेकडे राज्यभरातील शिक्षकांचे लक्ष लागले असून, पद्मभूषण अण्णा हजारे आणि पद्मश्री पोपटराव पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

ही माहिती शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण ठुबे यांनी पारनेर येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली. राज्य संघाचे नेते संभाजीराव थोरात आणि राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे यांच्या नेतृत्वाखाली या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रवीण ठुबे यांनी सांगितले की, सध्या टीईटी, संचमान्यता, पदोन्नती, बीएलओची कामे तसेच वाढत्या ऑनलाईन कामांच्या ओझ्यामुळे शिक्षक वर्गात मोठ्या प्रमाणात अस्वस्थता आहे. या पार्श्वभूमीवर सरकारी शाळांचे सक्षमीकरण, शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या आणि शिक्षण व्यवस्थेतील विविध प्रश्नांवर या परिषदेत सविस्तर चर्चा होणार आहे.

विशेष म्हणजे, सरकारी शाळांचा आवाज बनण्यासाठी अण्णा हजारे यांनी दाखविलेली तयारी ही शिक्षक चळवळीसाठी आशादायी बाब मानली जात आहे. त्यामुळे या परिषदेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या सभेला रावसाहेब रोहोकले, बाळासाहेब झावरे, आबासाहेब जगताप यांच्यासह राज्यभरातील अनेक शिक्षक नेते आणि हजारो शिक्षक उपस्थित राहणार आहेत. शिक्षकांच्या प्रश्नांवर आंदोलनाची पुढील दिशा निश्चित करण्यासाठी तसेच शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध तालुकाध्यक्षांनी स्पष्ट केले.

महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा जयश्रीताई झरेकर-इंगळे यांनी ही महामंडळ सभा अभूतपूर्व ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

स्वातंत्र्योत्तर काळात सामान्यांच्या हक्कांसाठी अनेक यशस्वी आंदोलनांचे केंद्र राहिलेल्या राळेगण सिद्धीच्या भूमीतून आता शिक्षकांच्या प्रश्नांसाठी संघटित आणि कायदेशीर लढ्याचे रणशिंग फुंकले जाणार असल्याची भावना शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

या पत्रकार परिषदेला प्रवीण ठुबे, सुरेश निवडुंगे, सूर्यकांत काळे, सुनील दुधाडे, युवराज हिलाळ, ज्ञानेश्वर इंगळे, अशोक गाडगे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यभरातील शिक्षकांसाठी ही सभा त्यांच्या मागण्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची आणि शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर एकत्रित भूमिका मांडण्याची मोठी संधी ठरणार आहे.

## अधिक मासानिमित्त पिंपळगाव माळवीत ७०० ज्येष्ठ नागरिकांचा भव्य सन्मान

**सुभाष झिने यांचा उपक्रम । आमरस-धोंडे जेवण, साडी व पोशाखाची भेट**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अधिक मासाच्या पावन पर्वानिमित्त माजी सरपंच तथा उद्योजक सुभाष झिने यांनी पिंपळगाव माळवी येथे एक अनोखा सामाजिक उपक्रम राबवत गावातील ज्येष्ठ नागरिकांचा भव्य सन्मान सोहळा आयोजित केला. या उपक्रमांतर्गत सुमारे ७०० ज्येष्ठ पुरुष, महिला तसेच विधवा नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना आमरस-धोंडे जेवणाचा आस्वाद देण्यात आला. तसेच पुरुषांना पोशाख आणि महिलांना साडी भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमामुळे गावात उत्साहाचे आणि आदराचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना आमदार कर्डिले म्हणाले, सुभाष झिने यांनी ज्येष्ठ नागरिकांचा



सन्मान करून सामाजिक जाणिवेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. समाजासाठी ज्येष्ठांचा अनुभव आणि मार्गदर्शन अत्यंत मौल्यवान आहे. अशा प्रकारचे उपक्रम इतरांनीही राबवावेत.

या कार्यक्रमात पुणे येथील प्रा. स्नेहा गायकवाड यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या म्हणाल्या, आजच्या तरुण पिढीने आपल्या ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्यांनी दिलेले संस्कार, मूल्ये आणि जीवनानुभव यामुळेच समाज घडतो. ज्येष्ठांकडून मिळणारा आधार आणि मार्गदर्शन तरुणांना जीवनाची योग्य दिशा देतात.

कार्यक्रमास मार्केट कमिटीचे माजी सभापती भानुदास कोतकर, माजी सभापती रघुनाथ झिने, बाजीराव गवारे, सरपंच राधिका प्रभुणे, उपसरपंच मच्छिंद्र झिने, विजय शेवाळे, कैलास पठारे, योगेश झिने, दत्तात्रय भोंदे, मेजर विश्वनाथ गुंड, बापू बेरड, संतोष झिने, संकेत शिंदे, शैलेंद्र काळे, कचरू सोनार, बबन झिने, निवृत्ती झिने, संतोष झिने आदी मान्यवर उपस्थित होते.

# आनंदगड येथे नूतन प्रवेशित विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत

**गुलाबपुष्प, औक्षण आणि आकर्षक सजावटीतून विद्यार्थ्यांचा गौरव । पालकांकडून शैक्षणिक संकुलाचे कौतुक**

**● अकोले । वीरभूमी–**

तालुक्यातील वीरगाव येथील आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, आनंदगड (वीरगाव) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अनोख्या आणि पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले.

विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ. अनिल रहाणे, संचालिका सौ. सुप्रिया वाकचौरे, सौ. गीता रहाणे, शिवराज वाकचौरे, सानिका वाकचौरे तसेच प्राचार्य किरण चौधरी यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन आणि औक्षण करून स्वागत करण्यात आले.

नूतन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रवेशद्वारासह संपूर्ण शालेय प्रांगणात भव्य सजावट करण्यात आली होती. तसेच प्रशस्त आणि आकर्षक रांगोळ्यांनी परिसर सुशोभित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या चिमुरड्यांचे करण्यात आलेले स्वागत आणि कौतुक पाहून पालक भारावून गेले. आधुनिकता आणि स्पर्धेच्या युगातही आनंदगड शैक्षणिक संकुलाने आपली सांस्कृतिक परंपरा जपल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रातील विश्वासार्ह आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे, तसेच विद्यार्थ्यांच्या ध्येयपूर्तीसाठी सातत्याने प्रयत्न करणारे शैक्षणिक संकुल म्हणून आनंदगडकडे पाहिले जाते, अशी प्रतिक्रिया पालक वर्गातून उमटली.

यावेळी वीरगावचे उपसरपंच जयवंत थोरात, अरुण कराड, वसतिगृह अधीक्षक रवींद्र आंबरे, कॅम्पस डायरेक्टर प्रा. संदीप थोरात, कार्यालयीन अधीक्षिका सौ. सीमा दिघे, सुपरवायझर सौ. अलका आहेर, सौ. प्रियंका तोरमल, लक्ष्मण कवडे, डॉ. विशाल रहाणे, ही पॉलिटेक्निकचे



प्राचार्य विनोद गिरी, फार्मसीच्या प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, समन्वयक विद्याचंद्र सातपुते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने यांच्यासह सर्व शिक्षक, पालक उपस्थित होते.

# 'शाळा आपल्या भेटीला' उपक्रमांतर्गत श्री धर्मनाथ विद्यालयाचा अनोखा गुणगौरव सोहळा

**सांगवी सूर्या येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान । विद्यार्थी, पालक आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याचा प्रयत्न**

**● निघोज । वीरभूमी –**

विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या इयत्ता दहावीच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी जवळा येथील श्री धर्मनाथ विद्यालयाने 'शाळा आपल्या भेटीला' या अभिनव उपक्रमांतर्गत सांगवी सूर्या येथे विशेष गुणगौरव सोहळ्याचे आयोजन केले.

सांगवी सूर्या या छोट्याशा गावातील सर्वसामान्य कुटुंबातून शिक्षण घेणाऱ्या कु. रोशनी अरुण गायकवाड, कु. वैष्णवी आढाव आणि करण अरुण गायकवाड या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्यांच्या या यशाचा गौरव करण्यासाठी विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य जी. बी. शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि ज्येष्ठ शिक्षक एस. एम. काळे यांच्या नियोजनातून ग्रामपंचायत कार्यालयासमोर हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमास गावचे सरपंच मोहन आढाव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांगवी सूर्या येथील शिक्षक शिर्के सर व गुंजाळ सर, विद्यार्थ्यांचे पालक, गावातील मान्यवर तसेच मराठी शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी एस. एम. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर शिर्के सर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदनपर मनोगत व्यक्त केले. गुंजाळ सर यांनी मराठी शाळा आणि ग्रामस्थांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अधोरेखित केले.

प्रभारी प्राचार्य जी. बी. शिंदे यांनी श्री धर्मनाथ विद्यालयाने गुणवत्ता आणि शैक्षणिक यशाच्या बाबतीत सातत्याने राखलेले स्थान, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. यशस्वी विद्यार्थ्यांनी विद्यालय, कुटुंब आणि गावाचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

गावाच्या वतीने बोलताना सरपंच मोहन आढाव यांनी गावाच्या शैक्षणिक विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली आणि या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. अशा कार्यक्रमांमुळे पुढील पिढीतील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी विद्यालयाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालय, शिक्षक, विद्यार्थी आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ करण्यासाठी विद्यालयाकडून सुरू असलेल्या प्रयत्नांचे उपस्थितांनी कौतुक केले. असे उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी एस. एम. काळे यांनी उपस्थितांचे आभार मानून विद्यार्थ्यांना



पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांनी इतरत्र प्रवेश न घेता जवळा येथील श्री धर्मनाथ विद्यालयातच प्रवेश घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले.

यावेळी गणेशराव आढाव, ज्ञानदेव आढाव, आनंदा कोठावळे, रघुनाथ कोठावळे, चंद्रकांत कोठावळे, ओंकार नगरे, कोंडीभाऊ आढाव, शिर्के सर, गुंजाळ सर, अंकुश गायकवाड, बबन साठे, देवराम कोठावळे, मच्छिंद्र आढाव, प्रकाश कोठावळे, रामदास कोठावळे, दिलीप कोठावळे, विठ्ठल म्हस्के, काळुराम म्हस्के, माऊली आढाव, अरुण गायकवाड आदी मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.

## SPOT NEWS



### जिल्हास्तरीय पेंचक सिलाट स्पर्धेत ढोरजळगावच्या विद्यार्थ्यांची सुवर्ण कामगिरी

**● शेवगाव । वीरभूमी –**

श्रीरामपूर येथे दिनांक ७ जून २०२६ रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय असोसिएशन पेंचक सिलाट स्पर्धेत ढोरजळगाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून गाव, शाळा आणि तालुक्याचे नाव जिल्हास्तरावर उज्ज्वल केले. या स्पर्धेत आरती वांढेकर, निकिता चव्हाण, आर्वी जाधव, युवराज केदार आणि भक्ती कराड यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. तसेच सरीफा इनामदार, श्रावणी नाकाडे आणि प्रांजल केदार यांनी रौप्यपदक मिळवून यशाची परंपरा कायम राखली. या सर्व यशस्वी खेळाडूंना कराटे प्रशिक्षक श्री. नवगिरे सर व सौ. नवगिरे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या पालकांचेही महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर शाळेचे, गावाचे आणि तालुक्याचे नाव जिल्हास्तरावर गाजवले असून त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### मिरीतील आदिवासी भिल्ल कुटुंबांना घरकुल व शेतीसाठी जागा द्या

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील मिरी गावातील भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजातील कुटुंबांना राहण्यासाठी तसेच उदरनिर्वाहासाठी शेती करण्याकरिता शासनाची जागा उपलब्ध करून द्यावी, या मागणीसाठी एकलव्य भिल्ल संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. एकलव्य भिल्ल संघटनेचे संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजंता गोलवाड तथा नाशिक विभागाचे सभापती शिवाजी ढवळे व चेअरमन अनिल गोलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी सयाजी पवार, सविता पवार, राजेंद्र माळी, आसराबाई माळी, रमेश पवार, सुनीता पवार, सोनू दळवी, अनिता दळवी, गंगा पवार, शहाजी पवार, शहादेव पवार, अंकुश पवार, जिजाबाई पवार, बाबासाहेब माळी, भाऊसाहेब पिंपळे, दुर्गा पिंपळे, रामकिसन माळी, शत्रुघ्न माळी, सोनाली माळी, सुनीता माळी, मनीषा माळी, कचरू माळी, कृष्णा माळी, मीरा माळी, विक्रम माळी, आशाबाई माळी, शरद पवार, परमेश्वर पवार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मिरी गावात आदिवासी भिल्ल समाजाची अनेक कुटुंबे वास्तव्यास असून त्यांचा प्रमुख व्यवसाय मोलमजुरी आहे. मात्र या कुटुंबांकडे स्वतःची शेती किंवा राहण्यासाठी जागा नसल्याने त्यांना अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. अनेक कुटुंबांना कायमस्वरूपी निवाऱ्याअभावी भटकंतीचे जीवन जगावे लागत असून मुलांच्या शिक्षणावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

### कुसुमबाई साळुंके यांचे निधन

**● पाथर्डी । वीरभूमी –**



तालुक्यातील कोरडगाव येथील कुसुमबाई रामभाऊ साळुंके यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या शिक्षक अण्णासाहेब साळुंके यांच्या मातोश्री होत. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### निवृत्त शिक्षिका रत्ना उंडे यांचे निधन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**



भिंगार येथील निवृत्त शिक्षिका रत्ना रमेश उंडे यांचे नुकतेच हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्या ६४ वर्षांच्या होत्या. त्यांच्यामागे पती, मुलगा, दोन मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत त्यांनी ३४ वर्षे सेवा केली. शिस्तप्रिय शिक्षिका म्हणून त्यांची ख्याती होती. निवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश उंडे यांच्या त्या पत्नी होत.

## मंगेश बेकारसे यांच्यावर कठोर कारवाईच्या मागणीसाठी

# पारनेरमध्ये पुरोगामी संघटनांचा विराट जनआक्रोश मोर्चा

**महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी । अन्यथा जिल्हाभर 'जेलभरो' आंदोलनाचा इशारा**

**● पारनेर । वीरभूमी –**

देशभरात वाढती महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या आणि महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना, सामाजिक सलोखा बिघडविणारे आणि महापुरुषांचा अवमान करणारे प्रकार वाढत असल्याच्या निषेधार्थ पारनेर येथे पुरोगामी चळवळीतील समविचारी संघटनांच्या वतीने विराट जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले.

या मोर्चाद्वारे शासन आणि प्रशासनाचे लक्ष वेधत विविध मागण्यांचे निवेदन पोलीस उपनिरीक्षक नितीन खंडागळे यांच्याकडे देण्यात आले.

मोर्चादरम्यान वक्त्यांनी सांगितले की, जाती-धर्माच्या नावाखाली प्रक्षोभक वक्तव्ये करून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बहुजन महापुरुषांची जाणीवपूर्वक बदनामी केली जात असून, अशा प्रकरणांमध्ये पोलीस प्रशासनाकडून दाखवली जाणारी उदासीनता चिंताजनक आहे. या प्रवृत्तींना वेळीच आळा घालण्यासाठी लोकशाही मार्गाने हा जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.

यावेळी बोलताना राजेंद्र करंदीकर यांनी आरोप केला की, महापुरुषांचा अवमान केल्याप्रकरणी मंगेश बेकारसे यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आलेली नाही. त्यांनी सांगितले की, सोमवार (दि. १५) पर्यंत संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई न झाल्यास जिल्हाभरातील पुरोगामी संघटना आणि पक्षांच्या वतीने 'जेलभरो' आंदोलन छेडण्यात येईल.




मोर्चाच्या माध्यमातून प्रशासनाकडे विविध मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय आंदोलनकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रकार थांबवावेत, दलित-आदिवासी समाजावरील अन्याय-अत्याचारांच्या प्रकरणांत हस्तक्षेप करून वैयक्तिक स्वार्थ साधणाऱ्या समाजविघातक घटकांची चौकशी करावी, तसेच ग्रामीण भागातील शोषित आणि पीडित नागरिकांची पोलीस कर्मचाऱ्यांकडून होणारी पिळवणूक तात्काळ थांबवावी, अशा मागण्याही निवेदनात करण्यात आल्या.

हे निवेदन पोलीस महानिरीक्षक (महाराष्ट्र राज्य) यांच्या नावे पारनेर पोलीस ठाण्यात सादर करण्यात आले असून त्याच्या प्रती पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

सामाजिक स्वास्थ्य, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचे रक्षण करण्यासाठी प्रशासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

या मोर्चात विविध पुरोगामी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. घोषणाबाजी करत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

## चोरट्यांचा मध्यरात्री हॉटेल फाडून विदेशी दारुवर डल्ला; एक लाखाचा मुद्देमाल चोरीला

**● पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील भुतेटाकळी येथील न्यू शुभम हॉटेलमध्ये अज्ञात चोरट्यांनी दरवाज्याचे कुलूप तोडून प्रवेश करत विदेशी मद्याचा साठा व रोख रक्कम असा एकूण १ लाख ४५ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हॉटेल चालक भगवान विठ्ठल भाबड (वय ३१) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ६ जून रोजी पहाटेच्या सुमारास ही चोरी झाली. फिर्यादी यांनी रात्री हॉटेल बंद करून कुलूप लावले होते. सकाळी हॉटेल उघडण्यासाठी आल्यावर मुख्य दरवाज्याचे कुलूप तुटलेले आढळले. आत जाऊन पाहणी केली असता हॉटेलमधील विदेशी मद्याच्या बाटल्या अस्ताव्यस्त पडलेल्या दिसल्या व मोठ्या प्रमाणात मद्यसाठा गायब असल्याचे निदर्शनास आले.

चोरट्यांनी विविध कंपन्यांच्या विदेशी मद्याच्या बाटल्या, बिअरचा साठा तसेच गल्ल्यातील १९ हजार ७०० रुपये रोख रक्कम चोरून नेली. चोरीस गेलेल्या मुद्देमालामध्ये विदेशी मद्याच्या २१९ बाटल्या, विविध ब्रँडच्या बिअरच्या बाटल्या आणि रोख रक्कमेचा समावेश असून त्याची एकूण किंमत १ लाख ४५ रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पाथर्डी पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

या घटनेमुळे परिसरातील व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीच्या वेळी सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## अकोलेतील वसुंधरा अकॅडेमीत विद्यार्थ्यांची किलबिल सुरू

**नवीन उमेद, नवीन स्वप्नांचे स्वागत । विद्यार्थ्यांचे औक्षणही केले**

**● अकोले । वीरभूमी –**

अभिनव शिक्षण संस्था संचलित वसुंधरा अकॅडेमीमध्ये उन्हाळी सुट्टीनंतर नव्या शैक्षणिक वर्षाची उत्साहपूर्ण सुरुवात झाली. आनंद, कुतूहल, उत्सुकता आणि नव्या आशांनी भरलेल्या वातावरणात विद्यार्थ्यांचे शाळेत आगमन झाले. विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने फुललेल्या परिसराने जणू शाळेच्या भिंती, वर्गखोल्या, बेंचेस, क्रीडांगण, लॉन्स तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आतुर असल्याचीच भावना व्यक्त केली.

शाळेचा संपूर्ण परिसर आकर्षक सजावट, रंगीबेरंगी फुगे, सुंदर रांगोळी, प्रेरणादायी फ्लेक्स आणि विविध कटआऊट्सनी सजविण्यात आला होता. त्यामुळे शालेय वातावरण प्रसन्न, आनंददायी आणि उत्साहवर्धक झाले होते. शाळेत येणाऱ्या



विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले, उपस्थित पालक, ज्येष्ठ शिक्षक सुनील खताळ, वृषाली शेटे, प्राजक्ता नेटके आणि इंद्रभान कोल्हाळ यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी इंद्रभान कोल्हाळ यांनी सुमधुर गीत सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

यावेळी प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख आणि उपप्राचार्या राधिका नवले यांनी शाळेत नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देताना अभ्यासासोबत कला, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. तसेच स्वयंशिस्त आणि सर्वांगीण विकासाचे महत्त्वही विद्यार्थ्यांना पटवून दिले.

कार्यक्रमामुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंद, उत्सव आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. याच दिवशी वाढदिवस असलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छापत्र देऊन विशेष शुभेच्छा देण्यात आल्या.

इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी शाळा सुरू झाल्याचा आनंद व्यक्त करत सेलिब्रेशन केक कापला. तसेच प्रशांत दिवेकर सरांसमवेत सादर केलेल्या रंगतदार नृत्यामुळे संपूर्ण परिसर आनंदमय वातावरणाने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाचा समारोप आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शकुंतला भांगरे यांनी केले.

# फसव्या कर्जमाफीविरोधात श्रीगोंद्यात शासन निर्णयाची होळी

**सरसकट कर्जमाफीसाठी शेतकऱ्यांचा एल्गार । तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या शासन निर्णयाविरोधात सोमवारी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर शेतकरी, विविध सामाजिक संघटना आणि सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करून आंदोलनकर्त्यांनी सरकारविरोधात संताप व्यक्त केला.

कोणत्याही अटी-शर्तींशिवाय सरसकट कर्जमाफी करून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, २०१९ मधील कर्जमाफी लाभार्थ्यांनाही नव्या योजनेत समाविष्ट करावे, पीक कर्जासह सर्व प्रकारच्या कृषी कर्जांचा समावेश करावा तसेच आजी-माजी सैनिक शेतकऱ्यांनाही लाभ द्यावा, अशा मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या.

यावेळी शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के यांनी शासनाच्या धोरणावर जोरदार टीका केली. निवडणुकीपूर्वी सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र प्रत्यक्षात अनेक अटी व निकष लावून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. ही कर्जमाफी नसून शेतकऱ्यांची फसवणूक आहे. न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष अनिल घनवट यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शवित शेवटपर्यंत साथ देण्याची ग्वाही दिली. संघर्ष क्रांती संघटनेचे प्रशांत दरेकर यांनी सरसकट कर्जमाफीसाठी लढा तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला, तर संभाजी ब्रिगेडचे अरविंद कापसे यांनी सर्वपक्षीय नेत्यांनी शेतकरी हितासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले.

यावेळी तहसीलदार सचिन डोंगरे यांनी आंदोलनकर्त्यांच्या वतीने निवेदन स्वीकारले. या आंदोलनात शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के, अनिल घनवट, मारुती भापकर, प्रशांत दरेकर, एकनाथ आळेकर, अरविंद कापसे, हेमंत नलगे, भाऊसाहेब नेटके, भास्कर वागस्कर, मुकुंद सोनटक्के, अनिल ठवाळ, राजेंद्र नागवडे, डॉ.




कोकाटे, गंगाराम दरेकर, रूपेश सूर्यवंशी, बाळासाहेब थोरात, इथापे, रामभाऊ गुणवरे, रघुनाथ ज्ञानेश्वर खेतमाळीस, महादेव म्हस्के यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# समशेरपूर-पागिरवाडी-शेरणखेल रस्त्याची दुरवस्था; विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती

**रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करा, अन्यथा तहसील कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा : उपसरपंच चक्रधर सदगीर**

**● अकोले । वीरभूमी–**

तालुक्यातील दुर्गम भागातील समशेरपूर-पागिरवाडी-शेरणखेल रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून या रस्त्याकडे ठेकेदार आणि प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली असून, रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अन्यथा मुथाळणे व पागिरवाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा मुथाळणे गावचे उपसरपंच चक्रधर सदगीर यांनी दिला आहे.

या रस्त्याचे काम दोन ठेकेदारांकडे देण्यात आले असल्याचे समजते. रस्त्याचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात करण्यात आले; मात्र दोन वर्षांचा कालावधी उलटूनही कामात अपेक्षित प्रगती झालेली नाही. अपूर्ण काम आणि रस्त्याच्या दुरवस्थेमुळे या मार्गावर एसटी बससेवा सुरू करण्यास संबंधित अधिकाऱ्यांनी नकार दिला आहे.

परिणामी, शाळा-महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, वाहतुकीच्या अभावामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. तसेच महिला, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांनाही प्रवासासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

चक्रधर सदगीर यांनी सांगितले की, ठेकेदाराने सुमारे वर्षभरापूर्वी रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात खडी टाकून ठेवली आहे. त्यामुळे रस्ता अरुंद झाला असून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांना आणि बसचालकांना वाहन चालविताना कसरत करावी लागत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

रस्त्याचे बीबीएमचे काम पूर्ण करण्यासाठी मुथाळणे ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. मात्र, शासनाकडून निधी उपलब्ध नसल्याने काम बंद असल्याचे कारण अधिकाऱ्यांकडून सांगितले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

शासनाच्या नियमानुसार पात्र ठेकेदाराला काम दिले जाते आणि काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे बिल अदा केले जाते. असे असताना निधी नसल्याचे कारण देत ठेकेदार काम पूर्ण करीत नसल्याबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

समशेरपूर-पागिरवाडी-शेरणखेल हा घाटरस्ता असून एका बाजूला खोल उतार आणि अनेक धोकादायक वळणे आहेत. अशा परिस्थितीत रस्त्यावर पडलेली खडी आणि खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणताही अडथळा न येता या रस्त्यावरून वाहन चालवून दाखवावे; तसे केल्यास त्यांचा योग्य सत्कार करून बक्षीस देण्यात येईल, असे जाहीर आव्हानही उपसरपंच चक्रधर सदगीर यांनी दिले.



आढळा विभागाकडे लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करत, पालकमंत्री आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी या प्रश्नात लक्ष घालावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित ठेकेदार रस्त्याचे काम पूर्ण करीत नसेल तर त्याचे नाव काळ्या यादीत टाकून दुसऱ्या ठेकेदारामार्फत काम पूर्ण करून घ्यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. रस्त्याचे काम तातडीने सुरू करून पूर्ण न केल्यास मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा उपसरपंच चक्रधर सदगीर यांनी दिला आहे.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# ठराविक पक्षाच्या कार्यकर्त्याप्रमाणे नव्हे, तर लोकसेवक म्हणून काम करा

## पंचायत समितीच्या जनता दरबारात आमदार आशुतोष काळे यांचे अधिकाऱ्यांना खडे बोल । नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांवर तातडीने कार्यवाहीचे निर्देश

**● कोपरगाव । वीरभूमी –**
तुम्हाला शासनाकडून मिळणारा पगार हा जनतेने भरलेल्या करातून दिला जातो. त्यामुळे ठराविक पक्षाच्या नागरिकांचीच कामे करण्याऐवजी सर्वसामान्य जनतेची कामे प्राधान्याने करा. तुम्ही जनतेचे सेवक आहात. तुमच्याकडे जो कोणी आपली अडचण किंवा काम घेऊन येईल, त्याला मदत करून त्याच्या समस्या सोडवा. नागरिकांची कामे शक्य तितक्या लवकर पूर्ण होतील याची काळजी घ्या. ठराविक पक्षाचा कार्यकर्ता म्हणून नव्हे, तर लोकसेवक म्हणून काम करा, असे खडे बोल आमदार आशुतोष काळे यांनी तहसील कार्यालयात आयोजित पंचायत समितीच्या जनता दरबारात अधिकाऱ्यांना सुनावले.

सोमवार (दि. ८) रोजी पंचायत समितीच्या विविध विभागांमध्ये प्रलंबित असलेल्या नागरिकांच्या कामांचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी संबंधित अधिकारी आणि नागरिकांना समोरासमोर आणून जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार आशुतोष काळे यांनी नागरिकांच्या अडचणी आपुलकीने जाणून घेतल्या आणि कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

जनता दरबारात अनेक नागरिकांनी आपल्या विविध समस्या आणि अडचणी आमदार काळे यांच्यासमोर मांडल्या. यावेळी त्यांनी शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन, घरकुल, बांधकाम, जलजीवन मिशन, मनरेगा आदी विभागांच्या कामांचा आढावा घेत उपस्थित अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली.

काही ग्रामसेवकांबाबत नागरिकांच्या वारंवार तक्रारी का येतात, असा सवाल उपस्थित करत, यापुढे अशा तक्रारी आल्यास संबंधितांविरोधात वरिष्ठ स्तरावर तक्रार करावी लागेल, असा सज्जड इशारा त्यांनी दिला.

घरकुल योजनेतील लाभार्थ्यांच्या जिओ-टॅगिंग प्रक्रियेत होणाऱ्या विलंबामुळे पुढील हप्त्याची रक्कम वेळेवर मिळत नसल्याचे निदर्शनास आणून देत, प्रलंबित जिओ-टॅगिंग तात्काळ पूर्ण करून लाभार्थ्यांना नियमानुसार हप्ते वितरित करावेत, तसेच बांधकामात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

पावसाळा सुरू झाल्याने आरोग्य विभागाने डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो यांसारख्या साथीच्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष दक्षता घ्यावी. गावपातळीवर जनजागृती, औषध फवारणी, स्वच्छता मोहीम आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

पशुसंवर्धन विभागाने पावसाळ्यात जनावरांना होणारे संभाव्य आजार टाळण्यासाठी लसीकरण, आरोग्य तपासणी शिबिरे आणि उपचार सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असेही त्यांनी सांगितले.

बांधकाम विभागाने सुरू असलेली अपूर्ण विकासकामे तातडीने पूर्ण करावीत. सोमवार (दि. १५) पासून शाळा सुरू होत असल्याने धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच जिल्हा परिषद शाळांमधील पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे अनेक पात्र महिलांना मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. अशा महिलांना योग्य व स्पष्ट माहिती द्यावी, त्यांना वारंवार कार्यालयीन फेऱ्या मारायला लावू नयेत आणि कोणत्याही प्रकारची उडवाउडवीची उत्तरे न देता योग्य मार्गदर्शन करावे, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

काही ग्रामसेवक त्यांना नेमून दिलेल्या गावात नियमित उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी येत असल्याचे सांगत, त्यांनी नेमून दिलेल्या दिवशी गावात उपस्थित राहावे, असे निर्देश दिले. ज्या ग्रामसेवकांकडे दोन गावांचा कार्यभार आहे त्यांनी निश्चित वार व वेळापत्रक ठरवून ग्रामस्थांना त्याची माहिती द्यावी, जेणेकरून नागरिकांना हेलपाटे मारावे लागणार नाहीत. ग्रामसेवकांनी नियमित उपस्थित राहून नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.



आंचलगाव ग्रामपंचायतीसाठी नियुक्त ग्रामसेवक कार्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याबाबत अनेक ग्रामस्थांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करावा, अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी गटविकास अधिकारी आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी गटविकास अधिकारी संदीप दळवी, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन प्रवीण शिंदे, कारभारी आगवणे, कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, दिलीपराव बोरनारे, अनिल कदम, राहुल रोहमारे, प्रशांत घुले, डॉ. मच्छिंद्र बर्डे, श्रावण आसने, विष्णू शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, जिनिंग प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनराव काळे, मधुकर टेके, वाल्मीकराव कोळपे, संभाजीराव काळे, शिवाजीराव ठाकरे, प्रशांत वाबळे, बाजार समितीचे संचालक राजेंद्र निकोले, रामदास केकाण आदी मान्यवरांसह पंचायत समितीच्या विविध विभागांचे अधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी तसेच विविध गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मढेवडगाव येथे शेतकऱ्यांचे आंदोलन

## कर्जमाफीच्या जाचक अटींविरोधात शेतकऱ्यांचा संताप

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
श्रीगोंदा तालुक्यातील मढेवडगाव येथे राज्य शासनाच्या कर्जमाफी योजनेतील जाचक अटी व गुंतागुंतीच्या प्रक्रियेविरोधात शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन केले. आंदोलनाचे नेतृत्व युवानेते स्मितल वाबळे यांनी केले असून शासनाच्या कर्जमाफीच्या जी.आर.ची (शासन आदेश) प्रतीकात्मक होळी करण्यात आली.



शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, शेतकरी जगला तरच देश जगेल अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. शेतकऱ्यांनी फार्मर आयडी, आधार अपडेट, केवायसी, सातबारा उतारा आदी कागदपत्रांच्या वारंवार मागणीमुळे मोठी गैरसोय होत असल्याची नाराजी व्यक्त केली.

खते, बियाणे व कीटकनाशकांच्या वाढत्या किमती, अपुरा वीजपुरवठा, हमीभावाची प्रभावी अंमलबजावणी नसणे आणि कर्जमाफी प्रक्रियेतील अडथळे यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचा आरोप आंदोलकांनी केला. योजना आहेत; मात्र अंमलबजावणी नाही, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलकांनी दिला.

यावेळी सरपंच प्रमोद शिंदे, राहुल साळवे, दत्तात्रय उंडे, सचिन उंडे, योगेश शिंदे, महेंद्र उंडे यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# निघोजमध्ये फसव्या कर्जमाफीच्या अध्यादेशाची होळी करत सरसकट कर्जमाफीची शेतकऱ्यांची मागणी

**● निघोज । वीरभूमी–**
शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी राज्य सरकारच्या कथित फसव्या कर्जमाफी धोरणाचा निषेध करत कर्जमाफीच्या अध्यादेशाच्या प्रतींची होळी केली. यावेळी राज्य सरकारने सर्वसामान्य शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न करता त्यांची दिशाभूल केल्याचा आरोप करण्यात आला.



राज्य शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेत २०१९ मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना वगळण्यात आल्याने राज्यातील मोठ्या प्रमाणातील शेतकरी या योजनेपासून वंचित राहणार असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून राज्यभरातून निषेध व्यक्त होत असल्याचे त्यांनी सांगितले.

अनिल शेटे यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीदरम्यान महायुती सरकारने आणि विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात जाहीर करण्यात आलेल्या अध्यादेशात अनेक जाचक अटी घालण्यात आल्याने सर्वसामान्य कर्जबाजारी शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

ते पुढे म्हणाले की, खत, बियाणे, मजुरी आणि इतर शेती खर्चात सातत्याने वाढ होत आहे. त्यातच अवकाळी पाऊस आणि बदलत्या हवामानामुळे शेती उत्पादनावर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून कर्जबाजारीपणा वाढत आहे. अशा परिस्थितीत शासनाने सरसकट कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक आहे.

आंदोलनकर्त्यांनी आरोप केला की, सरकार मोठ्या उद्योगपती आणि उद्योजकांना विविध सवलती देत असताना सर्वसामान्य शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत आहे. या धोरणाचा निषेध म्हणून कर्जमाफीच्या अध्यादेशाच्या कागदपत्रांची होळी करण्यात आली असून सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी राजूभाऊ लाळगे, मच्छिंद्र लाळगे, केशव शिंदे, गणेश भुकन, रामा शेटे, संतोष साबळे, संतोष परांडे, शैलेश लामखडे, विशाल लामखडे, लहू बिबळे, रामा सुपेकर, किरण लोंढे, संदीप बार्शीले, ज्ञानेश्वर हरणे, गौरव मुसळे, रोहित बिबळे, सागर साबळे, मळगंगा नित्य दर्शन चॅनलचे प्रतिनिधी दत्तात्रय रामभाऊ लंके यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय योग दिन कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन करा : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दि. २१ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय योग कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन करण्यात यावे. नागरिक, विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था तसेच विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी योग दिन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे तसेच विविध क्रीडा व योग संघटनांचे आणि क्रीडा भारतीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची 'योगा फॉर हेल्दी एजिंग' ही संकल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. नागरिकांमध्ये योगसाधनेविषयी जनजागृती निर्माण होऊन निरोगी जीवनशैलीचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

दि. २१ जून रोजी सकाळी ६ ते ८ या वेळेत सावेडी येथील जॉगिंग ट्रॅकवर आयोजित सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छता, वैद्यकीय सुविधा, वाहतूक नियंत्रण तसेच सुरक्षा व्यवस्थेचे प्रभावी नियोजन करण्यात यावे. कार्यक्रमस्थळी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

कार्यक्रमाचे नियोजन वेळेत पूर्ण करावे तसेच मोठ्या संख्येने नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी व्यापक जनजागृती करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# 'पुस्तकांचे गाव' उपक्रमासाठी ३० जूनपर्यंत प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण भागात ज्ञानाचा प्रसार अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'पुस्तकांचे गाव' या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी जिल्ह्यातून एका गावाची निवड करण्यात येणार असून इच्छुक ग्रामपंचायती, संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दि. ३० जून २०२६ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा मराठी भाषा समितीचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

राज्यात पुस्तकांचे गाव निर्माण करताना सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी, देवस्थानांनी, ग्रामपंचायतींनी, संस्थांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोणत्याही आर्थिक लाभाची अपेक्षा न ठेवता या उपक्रमात सहभागी व्हावे. या उपक्रमात व्यापक लोकसहभाग असणे आवश्यक असून त्याबाबतचा उल्लेख स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ठरावामध्ये असणे बंधनकारक आहे. प्रत्येक ग्रंथदालनाचे क्षेत्रफळ किमान १५० चौ. फूट असावे तसेच संबंधित जागा विनामूल्य उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. यासाठी किमान पाच वर्षांचा करार करणे बंधनकारक राहणार आहे. गावातील परिस्थितीनुसार उपलब्ध दालनांची संख्या व आकारमान कमी-जास्त असू शकते. त्याबाबतचा अंतिम निर्णय राज्य मराठी विकास संस्था घेणार आहे.

'पुस्तकांचे गाव' निवडीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले आहेत. त्यानुसार ही योजना फक्त ग्रामपंचायत, नगरपंचायत व 'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्रात राबविण्यात येणार आहे. संबंधित ग्रामपंचायत, नगरपंचायत अथवा नगरपरिषदेचा ठराव आवश्यक राहील. शासनाने घोषित केलेली पर्यटनस्थळे, तीर्थक्षेत्रे, ऐतिहासिक वारसा असलेली गावे, राज्य किंवा केंद्र संरक्षित स्मारके असलेली गावे तसेच संत गाडगेबाबा, आदर्श गाव, तंटामुक्ती, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आदी राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त गावांना प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच साहित्यिक किंवा वाङ्मयीन चळवळीची परंपरा असलेल्या गावांचाही विचार केला जाणार आहे.

प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा मराठी भाषा समितीकडून प्रत्यक्ष पाहणी करून पात्रतेचा अहवाल सादर करण्यात येईल व त्यानंतर गावाची अंतिम निवड करण्यात येईल. निवड झालेल्या गावात सुरुवातीला किमान दहा ग्रंथदालने सुरू करण्यात येतील. या दालनांसाठी आवश्यक आवर्ती व अनावर्ती खर्च शासनाकडून करण्यात येणार आहे. उपलब्ध जागा, वाचन संस्कृतीची परंपरा आणि पर्यटन विकासाची क्षमता या बाबींचा विचार करून गावाची निवड केली जाईल. केवळ पुस्तक विक्री किंवा प्रदर्शनापुरता हा उपक्रम मर्यादित न राहता वाचन प्रेरणा, साहित्यिक उपक्रम, ग्रंथदालने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून ज्ञानकेंद्र उभारून मराठी साहित्यविश्वाचे दर्शन घडविणे आणि पर्यटन विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

अधिक माहिती, अटी व शर्तींसाठी मराठी भाषा विभागाचा दि. ३० जानेवारी २०२६ रोजीचा शासन निर्णय पाहावा. इच्छुक मंडळांनी, देवस्थानांनी, ग्रामपंचायतींनी, संस्थांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव दि. ३० जून २०२६ पर्यंत संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्या नावे जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, त्रिवेणी कोर्ट कॉलनी, पंपिंग स्टेशन रोड, महालक्ष्मी उद्यानाजवळ, भुतकरवाडी, सावेडी, अहिल्यानगर येथे तीन प्रतींमध्ये सादर करावेत.

# जिल्हा वार्षिक योजनेतील विकासकामांचे नियोजन तातडीने सादर करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक संपन्न

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध विकासकामे करण्यात येत असून, मंजूर निधीतून करण्यात येणाऱ्या कामांचे नियोजन तातडीने सादर करण्यात यावे. तसेच, गतवर्षातील प्रलंबित कामे आणि 'स्पिल' (मागील वर्षाची अपूर्ण कामे) कामांच्या मागणीची माहिती संबंधित विभागांनी विलंब न करता उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले की, जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून हाती घेण्यात येणारी विकासकामे नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. मंजूर निधीचा प्रभावी आणि वेळेत वापर होण्यासाठी प्रत्येक विभागाने कामांचे नियोजन काटेकोरपणे तयार करावे. गतवर्षातील अपूर्ण व प्रलंबित कामे तसेच 'स्पिल-ओव्हर' कामांच्या मागणीचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत. पावसाळा जवळ आला असल्याने, पावसाळ्यापूर्वीची कामे गतीने पूर्ण करण्यावर विशेष भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शासनाचे सौर ऊर्जेच्या वापराला प्राधान्य असून, जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालये टप्प्याटप्प्याने सौरऊर्जा कार्यान्वित करण्यात यावीत. ऊर्जा बचत आणि पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने सौर ऊर्जेचा वापर वाढविणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागाने त्यांना मंजूर करण्यात आलेल्या निधीसंदर्भात तांत्रिक मान्यता घेऊन, प्रशासकीय मान्यतेसाठीचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत. विकासकामांच्या अंमलबजावणीत अनावश्यक विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

बैठकीत विविध विभागांच्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मंजूर निधी, प्रलंबित कामे, प्रस्तावांची सद्यस्थिती तसेच आगामी नियोजनाबाबत संबंधित विभागांकडून माहिती सादर करण्यात आली.

